# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.07.2025** **वार-शुक्रवार**

---

**सौर**

पुणे शहरात सौर ऊर्जेचा वापर दुपटीनं वाढला असल्याचं महापालिकेच्या पर्यावरण अहवालात नमूद केलं आहे. पुणे महापालिकेचा २०२४-२५ पर्यावरण सद्यस्थिती अहवाल विशेष सर्वसाधारण सभेत पर्यावरण विभागाचे उपायुक्त संतोष वारूळे यांनी सादर केला. २०२४-२५ मध्ये १ लाख ६६ हजार ५१२ किलोवॅट ऊर्जा, सौरऊर्जेच्या माध्यमातून वापरली गेली आहे. २०२३-२२४ मध्ये हा वापर ७९ हजार ६१८ किलोवॅट होता. एका वर्षात ५० हजार ९७ किलोवॅट क्षमतेचे सौर पत्रे बसविण्यात आले आहेत. एकंदर वापरापैकी ६१ टक्के वापर घरगुती कारणासाठी होत आहे.

**कार्यशाळा**

उसाचं उत्पादन आणि साखरेचा उतारा वाढवण्यासाठी शेतकरी, साखर उद्योग आणि संशोधन संस्था यांनी समन्वय साधण्याचं आवाहन धारवाड कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर एल. पाटील यांनी माजरी इथल्या वसंतदादा साखर संस्थेत - बदलत्या हवामानानुसार उस उत्पादन वाढीचं अद्ययावत तंत्रज्ञान - या विषयावर दोन दिवसांच्या कार्यशाळेचं उद्घाटन करताना केलं.

या  कार्यशाळेत विविध संशोधन संस्थांचे शास्त्रज्ञ, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, कृषी आणि उस विकास अधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. उस उत्पादन, तोडणी तंत्रज्ञान, वाण निर्मिती, हवामान अनुकूल पीक व्यवस्थापन या विषयांवर सखोल सादरीकरण या कार्यशाळेत होणार आहे.

**<u>पिकविमा</u>**

यंदाच्या खरीप आणि रबी हंगामासाठी पीक विमा योजनेसाठी आतापर्यंत केवळ 55 हजार शेतकऱ्यांनी खरिपातील पिकांसाठी पीक विमा उतरविला आहे. 31 जुलै ही पीक विम्याची अंतिम तारीख आहे. एका रुपयात पीक विमा योजनेत अनेक गैरप्रकार उघडकीस आल्यानं ती बंद करण्यात आली  आहे. यंदा पीक कापणी प्रयोगातून निघालेल्या उत्पादनावर आधारित पीक विम्याची नुकसान भरपाई मिळणार आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी पीक विमा काढून घ्यावा असं आवाहन पुणे  कृषी विभागाकडून करण्यात आलं आहे.

**<u>शिष्यवृत्ती</u>**

पुणे महापालिकेतर्फे इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यासाठी 1 ऑगस्ट ते 31 डिसेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत, अशी माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त अरविंद माळी यांनी दिली.  ऑनलाइन अर्ज भरल्यानंतरच पुढील प्रक्रिया केली जाणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. महापालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या 80 टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या खुल्या गटातील विद्यार्थी, पुणे महापालिकेच्या शाळेतील किमान 70 टक्के गुण मिळवलेले विद्यार्थी, मागासवर्गीय विद्यार्थी, 40 टक्क्यांहून अधिक अपंगत्व असलेले आणि 55 टक्के गुण मिळवलेले विद्यार्थी, तसेच कचरावेचक, बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे किंवा कचरा व्यवस्थापनाशी संबंधित असंघटित कामगारांच्या मुलांनी किमान 65 टक्के गुण मिळवले असल्यास ते या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत.

**<u>गोसेवा</u>**

राष्ट्रीय गौ सेवक संघाच्या वतीनं भारताच्या पुनर्निमाणाच्या दिशेनं ६१ दिवसांच्या ऐतिहासिक गौ राष्ट्र यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. या यात्रेचं पुण्यात आगमन झालं आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीनं औंध इथल्या गोसेवा आयोग कार्यालयाच्या प्रांगणात या यात्रेचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. ही यात्रा देशभरातील १२ राज्यांतून प्रवास करत एकंदर १० हजार १२७ किलोमीटर अंतर कापणार आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा म्हणाले की, देशी गोवंशाचं संगोपन आणि संवर्धन व्हावं, तसंच गायींवर आधारित शेती केली जावी, या उद्‌देशानं जनजागृतीपर ही यात्रा पुण्यात आली आहे.

**<u>प्लास्टीक</u>**

पुणे महापालिकेच्या कार्यालयामध्ये प्लास्टिक फाइल्स, बाटल्या, प्लास्टिक कप, प्लास्टिक लावलेले बुके आदी वस्तूंचा वापर होऊ नये, तसंच चहासाठी वापरल्या जाणाऱ्या कागदी कपांच्या आतील बाजूस प्लास्टिकचं आवरण असल्यामुळे ते देखील वापरणं त्वरित बंद करावं, असा आदेश पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सर्व विभाग, क्षेत्रीय कार्यालयं आणि परिमंडळ यांना दिला आहे.

**<u>वाहतूक</u>**

साठे यांच्या जयंतीनिमित्त १ ऑगस्टला सारसबाग इथल्या त्यांच्या पुतळ्यावर अभिवादन करण्यासाठी गर्दी होते. यामुळं वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. यासाठी १ ऑगस्टला सारसबाग परिसरात वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. सारसबागेकडून स्वारगेटकडं जाणारा रस्ता बंद करण्यात येणार आहे. त्यामुळं नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा असं आवाहन पोलीस प्रशासनानं केलं आहे.

**<u>वैदिक</u>**

श्रीशारदापीठम् , शृंगेरी आणि वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे यांच्याद्‌वारे 1 ते 3 ऑगस्ट या कालावधीत पुण्यात वैदिक संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. वेदशास्त्रोत्तेजक सभेचं यंदा शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यानं संस्थेला आयोजनाचा मान मिळाला आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष भगवंत ठिपसे, कार्यवाह श्रद्‌धा परांजपे, प्रशांत पुंड यांनी निवेदनाद्‌वारे दिली आहे. शुक्रवार 1 ऑगस्टला दुपारी 4 वाजता शोभायात्रेचं आयोजन करण्यात आलं असून त्यानंतर संमेलनाचा उद्‌घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. उद्‌घाटन समारंभानिमित्त राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. डॉ. चारुदत्त आफळे यांचं ‘श्रीमद्  आद्‌य शंकराचार्य’  याविषयावर कीर्तन होणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**